मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे यांचे कार्यालय, जुनी पी.एम.टी. बिल्डिंग, शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे-४११ ०३७, दूरध्वनी क्रमांक २४४४५८६४, फॅक्स २४४४२६८५.

१६४

विषय- तत्कालीन उपवनसंरक्षक, पुणे श्री. मंगरुळकर, यांच्या मदतीने श्रीमती मधू कपूर यांनी राखीव वन च्या करत असलेल्या विक्रीबाबत तक्रार.

क्रमांक कक्ष-१/जमीन/प्र.क्र.१३०/१३५० /२०१०-११.
पुणे ४११ ०३७, दिनांक १२ जानेवारी, २०११.

**प्रति,**

**मुख्य वनसंरक्षक (संधारण)**
**महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**संदर्भ** आपलेकडील पत्र क्रमांक कक्ष-१२/जमीन/३/पुणे/प्र.क्र. २३ (१०-११)/६८ दिनांक २६.४.२०१०

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये मागविण्यात आलेला अहवाल वनसंरक्षक, पुणे वनविभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र कक्ष-६/जमीन/३० दिनांक ६/४/२०१० व कक्ष-६/जमीन/१४९० दिनांक ४/११/२०१० अन्वये या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर अहवालात नमूद केलेप्रमाणे पुढीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

श्रीमती राधिका चेतन मेहेरा व मधुप्रकाश कपूर यांनी दिनांक १६/९/२००० रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरोता यांचेकडे मालकी सर्व्हे नं. ४ (गट नं. १५) व मालकी सर्व्हे नं ३ (गट नं. १३) मध्ये राहण्यासाठी बंगला बांधणार असल्याने सदर क्षेत्रावर झाडे लावलेबाबतचे प्रमाणपत्र मिळणेस विनंती केली होती. त्याअनुषंगाने प्रकरणी चौकशी करून त्याप्रमाणेचा अहवाल वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरोता यांचेकडील पत्र क्र अ/आस्था/४५८ दिनांक १/११/२००० व ४५९ दिनांक १/११/२००० अन्वये तत्कालीन उपवनसंरक्षक, पुणे यांचेकडे सादर करण्यात आला. सदर अहवालाच्या अनुषंगाने तत्कालीन उपवनसंरक्षक, पुणे श्री. राजेंद्र मंगळूरकर यांनी त्यांचेकडील पत्र क्र ब/कक्ष-३/जमीन/२०८३ दिनांक ४/१२/२००० व २०२८ दिनांक ४/१२/२००० अन्वये संबंधित अर्जदाराला त्यांचे मागणीप्रमाणे मौजे पांगळोली गट नं १५ क्षेत्र १.५५ हेक्टर व गट नं १३ क्षेत्र ०.७७ हेक्टर या क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या वृक्षाबाबतची माहिती देण्यात आली.

सद्यस्थितीत गट नं. १३ व १५ बाबतच्या कागदपत्राची खात्री केली असता त्याचा जुना सर्व्हे नं ५९ व ६१ असल्याचे दिसून येते. सदर सर्व्हे नं. चे (५९ व ६१) धारकास भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ३५ (३) नुसार नोटीस सन १९५६ मध्ये बजावल्याचे दिसून येते. त्याप्रमाणेची नोंद तत्कालीन विभागीय वन अधिकारी, पुणे यांनी तत्कालीन वनसंरक्षक, पुणे (सेंट्रल सर्कल) यांना सादर केलेल्या मासिक अहवालात आहे. तद्नंतर महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ चे कलम ३ (१) प्रमाण ची नोटीस दिनांक २८/२/१९७६ रोजी सदर क्षेत्राचे मालक श्री. प्रभाकर पुरुषोत्तम डहाणूकर व श्री. खंडू भिमा अंबुरे यांना बजावल्याप्रमाणे ते दिनांक ३०/८/१९७५ रोजी मालक होते. परंतु सदर क्षेत्राचा



वनसंरक्षक पुणे वनविभाग,पुणे
३४९९
मुख्य लेखापाल.

माहिती अधिकारी
तथा
मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, पुणे.

ताबा घेताना तो प्रत्यक्ष मूळ मालकाकडून घेतल्याचे दिसून येत नाही. असे वनसंरक्षक, पुणे यांचे अहवालात नमूद केले आहे. (७६३)

प्रकरणी अर्जदार यांनी उपरोक्त प्रमाणे मागणी केलेल्या प्रमाणपत्राच्या अनुषंगाने अर्जदाराकडून वनविभागाकडे दाखल केलेल्या दस्तऐवजामध्ये गट नं. १३ व १५ चे मूळ सर्व्हे नं. अनुक्रमे ५९ व ६१ असल्याचे नमूद नव्हते. तसेच सदरची माहिती महसूल विभागाकडूनही अप्राप्त होती. त्यामुळे प्रकरणातील अर्जदारास वृक्षाबाबतचे दिलेले प्रमाणपत्र हे उपलब्ध कागदपत्राच्या आधारवर व वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरोता यांचे अहवालावरुन देण्यात आलेले होते. तसेच सदरचे प्रमाणपत्र हे केवळ अस्तित्वात असलेल्या वृक्षाबाबतचेच होते. त्यामुळे सदर प्रमाणपत्रात अर्जदारास वनेत्तर कामास अनुमती असल्याबाबतचा कुठेही उल्लेख नाही.

प्रकरणातील क्षेत्र खाजगी वनात येत असल्याने त्यावर वनेत्तर काम झाल्याचे निदर्शनास आल्याने वनपाल, कार्ला, (वनपरिक्षेत्र शिरोता) यांनी भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २६ नुसार प्रथम गुन्हा रिपोर्ट क्रमांक ४ दिनांक १२/९/२००३ अन्वये गुन्हा नोंदविला आहे. तसेच सहा. वनसंरक्षक, पुणे यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५३,५४ नुसार नोटीस देवून त्याबाबत सुनावणी घेवून त्यांचेकडील पत्र क्र ब/कक्ष-३/सवंस/४० दिनांक १०/६/२००४ अन्वये संबंधितांना आदेश पारित केले.

पुणे वनविभागातील महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम १९७५ अंतर्गत संपादित झालेल्या क्षेत्राबाबतच्या नोंदी घेणेबाबत वारंवार महसूल विभागास कळविले होते. तथापि रिट याचिका क्रमांक २९८०/२००१ रूपांतरित जनहित याचिका क्रमांक १७/२००२ मुंबई पर्यावरण कृती समिती विरूध्द महाराष्ट्र शासन बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार ७/१२ अभिलेख्यात खाजगी वनाबाबतच्या नोंदी सन २००५ पासून घेण्याची कार्यवाही महसूल विभागाकडून करण्यात येत आहे. प्रकरणातील क्षेत्राचे ७/१२ अभिलेखात महाराष्ट्र खाजगी वन संपादन अशी नोंद दिनांक ८/१०/२००८ रोजी महसूल विभागाकडून घेतल्याचे दिसून येते.

सद्यस्थितीत प्रकरणातील क्षेत्र मा. सर्वोच्च न्यायालयाच्या Central Empowered committee ने वर्गवारी केलेल्या यादीतील असून त्याप्रमाणेचा अहवाल या कार्यालयाचे पत्र क्र कक्ष-१/जमीन/सीइसी/१२९२ दिनांक ३/१२/२०१० अन्वये आपले कार्यालयास पाठविण्यात आलेला आहे. कृपया वरील वस्तुस्थितीचे अवलोकन होऊन प्रकरणी पुढील कार्यवाही होणेस विनंती आहे.

स्वाक्षरी/-
(अ. सु. कु. सिन्हा)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे.

प्रत,

वनसंरक्षक,पुणे वन विभाग, पुणे. यांचेकडे त्यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-६/ जमीन/३० दिनांक ६.४.२०१० व १४९० दिनांक ४.११.२०१० चे अनुषंगाने माहितीसाठी रवाना.

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे.

D:\Letter reg complaint against Shri Mangrulkar.doc

माहिती अधिकारी
तथा
मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, पुणे.